शासकीय सेवकांच्या विभागीय चौकशा व निलंबनासंदर्भातील माहिती संगणकीय आज्ञावलीव्दारे उपलब्ध करणेबाबत .

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.निप्रआ -१११२/प्र.क्र.८२/११अ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १ जानेवारी,२०१६

वाचा :-

१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.निप्रआ-१११२/प्र.क्र.८२/११-अ, दि.२३.०४.२०१३

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही २०१४/प्र.क्र.२५/२०१४ /१२, दि.०४.०२.२०१४

३) शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अभियो-१३१४/प्र.क्र.८६/११-अ, दि.३१.१.२०१५

४) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकिर्ण-१०१४/प्र.क्र.४३/११-अ, दि.३०.६.२०१५

प्रस्तावना -:

शासकीय कर्मचाऱ्यांच्या विभागीय चौकशीची प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित न रहाता त्यांचा त्वरेने निपटारा व्हावा व निलंबित कर्मचाऱ्यांचा नियमित पणे निलंबन आढावा घेण्याच्या सूचना शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, दि.२३ एप्रिल,२०१३ अन्वये दिलेल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.१ व संदर्भ क्र.२ मधील नमूद शासन परिपत्रकान्वये सेवाविषयक माहिती अंतर्गत प्रशासकीय विभागांना विभागीय चौकशा आणि निलंबित कर्मचारी यांची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

त्रैमासिक आढाव्याकरिता सर्व विभागांची माहिती एकत्रित रित्या उपलब्ध होण्यास व चौकशीची प्रकरणे नेमकी कोणत्या टप्प्यावर प्रलंबित राहतात याची माहिती संबंधितांना असणे, प्रलंबित विभागीय चौकशी प्रकरणांचा निपटारा जलदगतीने करणे आणि निलंबित कर्मचाऱ्यांच्या प्रकरणांचा आढावा घेण्याच्या कार्यवाहीसाठी अद्ययावत माहिती संबंधित प्रशासकीय विभागांना उपलब्ध होण्याकरिता संगणक प्रणाली विकसित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणांचा तातडीने व सातत्याने निपटारा करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. संगणक प्रणालीवर सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालयांनी अचूक माहिती भरावयाची आहे. शासनाच्या धोरणात्मक व प्रशासकीय निर्णय प्रक्रियेकरिता विविध प्रशासकीय विभागांद्वारे विविध स्तरांवर सांख्यिकी माहिती व आकडेवारी गोळा केली जाते व त्या आधारे निर्णय घेतला जातो. परिणामी या आकडेवारीस अनन्य साधारण महत्व आहे.

२. या शासन निर्णयान्वये सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना व शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्यांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत-:

i. आज्ञावलीचे सनियंत्रण व प्रचालन सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त राहील.

ii. आज्ञावली मध्ये समाविष्ट प्रशासकीय विभागाच्या माहितीबाबत व त्यासंदर्भात उपस्थित होणाऱ्या बाबींबाबत संबंधित प्रशासकीय विभाग जबाबदार असेल.

iii. आज्ञावलीचे प्रचालन,सनियंत्रण व अनुषंगिक बाबीसाठी सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी व शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्यांनी पुढील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे कार्यपध्दती अनुसरावी.:-

३. संगणक आज्ञावली मध्ये माहितीची नोंद करणे/भरणे (Uploading of information) -

३.१ विभागीय चौकशी व निलंबित कर्मचारी यांची माहिती
URL : https://de.maharashtra.gov.in **संगणक स्थळावर भरण्यात यावी.**

३.२ संगणक प्रणाली विभागीय चौकशीची आज्ञावली अंतर्गत

i. Super Admin

ii. Department Admin

Departmental User असे तीन भाग करण्यात आले आहेत.

३.३ सामान्य प्रशासन विभाग Super Admin म्हणून माहितीवरील कामकाज हाताळणार आहे. Departmental Admin म्हणून प्रशासकीय विभागाने उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याची नोडल ऑफीसर म्हणून नेमणूक करावी. Departmental User म्हणून प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या विभागीय चौकशी विषय हाताळणाऱ्या समन्वय/ आस्थापना अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी आज्ञावलीवर माहीती भरावी.

३.४ प्रत्येक प्रशासकीय विभागांसाठी login ID व Password दिलेला असून आवश्यकतेनुसार सदरहू Password बदलून घेण्याची कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागाच्या नोडल अधिकाऱ्यांनी करावी. पासवर्डची गुप्तता राखण्यासाठी प्रशिक्षणाच्या वेळी प्रशासकीय विभागाच्या वतीने उपस्थित राहणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना तो देण्यात येईल.

३.५ माहिती कशी भरावी याबाबतची माहिती पुस्तिका संगणक आज्ञावलीवर उपलब्ध करण्यात आली आहे.

४. नोडल अधिकारी यांच्यावरील जबाबदारी-

४.१ आज्ञावलीमध्ये असलेल्या माहितीची नोंद (Data Entry) /उपलब्धता व वैधता याबाबतची जबाबदारी नोडल अधिकाऱ्याची यांचेवर राहील.

४.२ प्राधिकृत व्यक्तीने किंवा कार्यालयाने संगणक आज्ञावली मध्ये नोंदविलेली माहिती ही संबंधित प्रशासकीय विभागाच्या नोडल अधिकाऱ्यांच्या मान्यतेने नोंदविण्यात आली आहे, असे समजण्यात येईल.

४.३ संगणक प्रणाली / आज्ञावली मध्ये नोंदविलेली माहिती कालबाहय ठरु नये म्हणून माहिती नियतकालिकरित्या अद्ययावत करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागातील नोडल अधिकारी यांचेवर राहील.

४.४ <u>नियतकालिक माहिती अद्ययावत करण्यासाठीची वारंवारीता महिना समाप्ती नंतर सात दिवसाच्या आत अशी निश्चित केली आहे.</u> त्याप्रमाणे सर्व विभागांच्या नोडल अधिकारी यांनी माहिती भरण्याबाबत संबंधितांना निर्देश द्यावेत. सदर माहिती प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालय अशी मिळून गट-अ ते गट-ड च्या कर्मचाऱ्यांची असेल.

४.५ आज्ञावलीतील माहिती अधिकृत रित्या शासकीय कामासाठी तसेच इतर सर्व प्रयोजनाकरिता ती उपलब्ध करुन दिली जाणार आहे. त्यामुळे माहिती काळजीपुर्वक भरण्याची अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी संबधित विभागातील नोडल अधिकारी यांची राहील

५. **अडचणींचे निराकरण**-

५.१ प्रस्तुत माहिती भरताना अडचणी उद्भल्यास कार्यासन ११-अ, सामान्य प्रशासन विभागामधील अधिकारी/ कर्मचारी यांचेशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

अवर सचिव / कक्ष अधिकारी,
कार्यासन क्र.११-अ, रुम नं.७२५-अ (विस्तार),
७ वा मजला, सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दूरध्वनी क्र.(०२२) - २२०२३१२१

५.२ माहिती भरताना तांत्रिक अडचणीसंदर्भात खाली संपर्क साधावा.:-

श्री.अजय गुप्ता
सहायक सल्लागार, महाऑनलाईन लि.
जे.व्ही.ऑफ गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र ॲन्ड टि. सी.एस.,
बोर्ड नं.- +९१२२ ६७०७ ७०००, विस्तार-१३३
E-mail-ajay.gupta@mahaonline.gov.in
भ्र.क्र. +९१ ९१६८६८ १९२०

श्री. स्वप्नील वाघमारे
सहायक सल्लागार, महाऑनलाईन लि.
जे.व्ही.ऑफ गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र ॲन्ड टि. सी.एस.,
E-mail-swapneel.waghmare@mahaonline.gov.in
भ्र.क्र. ९१६८६८१९३८

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०४१६२७००७००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHAT VENKATESH MADHAV

Digitally signed by BHAT VENKATESH MADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMIN DEPT,CID - 916890, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6e277c9088a4cb8b53e535a4642a6800b908c5dbdb3a63175760874eba717ae1, cn=BHAT VENKATESH MADHAV
Date: 2016.01.04 16:41:38 +05'30'

(व्यं.मा.भट)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
४. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
५. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
६. व्यवस्थापकीय संचालक, महाऑनलाईन लिमिटेड, दहावा मजला, गोदरेज कोलिजम, सायन (पू.), मुंबई - ४०००२२ महाऑनलाईन, मुंबई
७. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नविन प्रशासकीय इमारत, मंत्रालय, मुंबई
८. सह/उपसचिव (विभागीय चौकशी /आस्थापना शाखा) मंत्रालय, मुंबई
९. श्री.अजय गुप्ता, सहायक सल्लागार व श्री.स्वप्नील वाघमारे, सल्लागार, महाऑनलाईन, मुंबई
१०. अवर सचिव, १९-अ कार्यासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११.निवडनस्ती